सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

कार्यक्रम अंदाजपत्रक

२०२२-२०२३

वित्त विभाग

(संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा)

(प्रकाशन क्रमांक ६)

*

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
२०२२

कार्यक्रम अंदाजपत्रक

२०२२-२०२३

वित्त विभाग

(संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा)

(प्रकाशन क्रमांक ६)

एच २४४९–१

वित्त विभाग - कार्यक्रम अंदाजपत्रक

१	वित्त विभाग, मंत्रालय
२	संचालनालय, लेखा व कोषागारे
३	वस्तू व सेवाकर विभाग
४	महाराष्ट्र राज्य लॉटरी
५	विमा प्रशासन संचालनालय
६	संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा

अनुक्रमणिका

प्रकरण क्र.	शीर्षक	पृष्ठ क्रमांक
	प्रस्तावना	(सात)
१	एक संक्षिप्त उत्क्रांती (विकासवादी) दृष्टीकोन	१
२	संस्थात्मक रचना	३
३	कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या	५
४	आर्थिक वर्ष २०२२-२३ साठीच्या कामाचा आढावा	९
५	ई-गव्हर्नन्सच्या दिशेने	१२
६	परिशिष्ट	
	परिशिष्ट १ : अर्थसंकल्पीय तरतूद	१५
	परिशिष्ट २ : पदनिहाय विवरणपत्र	१६
	परिशिष्ट ३ : कार्यरत महिला अधिकारी/ कर्मचारी यांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारे विवरणपत्र	१७

प्रस्तावना

"उत्तरदायित्व आणि पारदर्शकता" या लोकशाही व्यवस्थेतील सुशासनाची दोन मुख्य तत्त्वांचे पालन सार्वजनिक लेखापरीक्षणाचे कार्य किती चांगल्या प्रकारे पार पाडली जातात यावर अवलंबून असते.

श्री. विनोद राय, माजी महानियंत्रक व महालेखापाल, भारत

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे लेखापरीक्षण करतात. महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनयिम १९३० च्या कलम (३)(एक)(अ) अन्वये संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग यांना "संवैधानिक मुख्य लेखापरीक्षक" म्हणून घोषित केले आहे. ज्यांना मुख्यत: महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनयम १९३० व तत्संबधी दुरूस्ती नियम व अधिनियमाद्वारे लेखापरीक्षण करणे तद्नुषंगिक कार्य करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या व्यतिरिक्त संचालनालयाकडे अनेक प्रमुख संस्थांचे लेखापरीक्षण सोपविण्यात आले आहे, प्रामुख्याने महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापीठे, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आणि २२४ विविध संकिर्ण संस्था इ. याप्रकारे संचालनालयाच्या लेखापरीक्षणाचा विस्तार दर वर्षी २८,८४९ संस्थां पर्यत वाढला आहे.

लेखापरीक्षणाच्या उद्देशानुसार संचालनालय ज्या संस्थाचे लेखापरीक्षण करतात त्याच्या कामकाजाबाबत अपहार, गैरव्यवहार व दुर्विनियोग निदर्शनास आणून देऊन त्या संस्थामध्ये कार्यक्षमता, जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी आपली भूमिका बजावते. राज्य विधानमंडळाच्या पंचायती राज समितीने तपासलेल्या वार्षिक पुनर्विलोकन अहवालाद्वारे आर्थिक विवेक आणि शिस्त आत्मसात करण्यास देखील मदत करते.

महाराष्ट्र शासनाचे संगणकीकरणाचे धोरण व त्यानुषंगाने लेखापरीक्षणाची बदलेली कार्यपध्दती यामुळे संचालनालयाचे लेखापरीक्षणाचे कामकाज अधिक कार्यक्षमतेने होण्यासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाने **MAINS (Maharashtra Audit Information Network System)** या संगणक प्रणालीव्दारे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद,नगरपालिका व महानगरपालिकांचे लेखापरीक्षण नियोजनाच्या टप्प्यापासून ते अहवाल निर्गमनापर्यतची प्रक्रिया स्वयंचलित (Online) केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण अनुपालनाची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी **"परिच्छेद अनुपालन पोर्टल" (Local Fund compliance of Audit Para L-CAP)** हे वेब पोर्टल विकसित केले आहे. तसेच **"वार्षिक पुनर्विलोकन लेखापरीक्षण अहवाल"** च्या संकलनासाठी **RAR (Review Audit Report)** वेब पोर्टल विकसित केले आहे. अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणाचे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

पंचायती राज मंत्रालय-२०२० भारत सरकार यांच्या शिफारशीनुसार सन ,२१ या आर्थिक वर्षापासून १४ व्या व १५व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानाचे ग्रांमपंचायत खात्याचे लेखापरीक्षण

करण्याकरिता **AOL (Audit Online System)**या संगणक प्रणालीचा महाराष्ट्र राज्याने स्वीकार केला आहे.

त्यानुषंगाने संचालनालयाने सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे ग्रामपंचायतीचे २०% लेखापरीक्षण **AOL (Audit Online System)** या संगणक प्रणालीवर पूर्ण करण्याचे लक्ष साध्य केले आहे. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता प्राप्त अनुदानाचे १००% ग्रामपंचायत लेखापरीक्षण **AOL (Audit Online System)** संगणकप्रणालीवर माहे मार्च, २०२२ पर्यत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याचा निर्धार आहे.

उपरोक्त प्रमाणे संचालनालयाने केलेल्या संगणकीकरणाचा प्रभावी वापर लेखापरीक्षणाच्या कामकाजात तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यक्षमता व गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने राज्यातील विविध प्रशिक्षण संस्थामार्फत ऑनलाईन आणि ऑफलाईन प्रशिक्षण कार्यक्रम संचालनालयाच्या वतीने आयोजित केले आहेत. तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापाल कार्यालयाकडून ही तांत्रिक मार्गदर्शनही वेळोवेळी मिळत असते. विविध वित्त आयोगाच्या शिफारशी व मार्गदर्शक तत्वांनी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास आपल्या लेखापरीक्षण पध्दतीत आणखी सुधारणा करण्यासाठी आणि प्रमाणित करण्यास मदत मिळाली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कक्षेत असलेल्या विविध संस्थांचे आवश्यक असेल तेव्हा विशेष लेखापरीक्षण करण्यासाठी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयास शासनाकडून प्राधिकृत करण्यात येते. हे केवळ लेखापरीक्षक म्हणून स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाची विश्वासार्हताच नाही तर वर्तमान संदर्भात तिची वाढती महत्वाची भूमिका देखील अधोरेखित करते.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या लेखापरीक्षणाची व्याप्ती सतत विस्तारत असून संचालनालयाने शासकीय लेखापरीक्षण क्षेत्रात व्यावसायिक मानके आणि कौशल्य प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षक म्हणून संचालनालय केवळ पाहरेकरी (वॉचडॉग) म्हणून काम करत नाहीत तर, त्यांच्यासाठी एक मित्र, तत्त्वज्ञ आणि मार्गदर्शक म्हणून काम करते.

20/01/2022

(माधव नागरगोजे)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
संचालनालय, महाराष्ट्र राज्य

प्रकरण १

एक संक्षिप्त उत्क्रांती (विकासवादी) दृष्टीकोन

भारतातील पंचायती राज संस्था सत्तेचे विकेंद्रीकरण व लोकसहभागासह तळागाळातील लोकशाहीची कल्पना करते. आधुनिक काळात विविध घडामोडीतून स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास झाला ज्याची सुरुवात लॉड मेयो यांच्या १८७० चा स्थानिक स्वराज्य संस्थेचा ठराव व लॉर्ड रिपॉनचा १८८२ चा ठराव, ज्याला **" स्थानिक स्वराज्य संस्थांचा मॅग्ना कार्टा "** असेही म्हटले जाते, यांपासून झाली. भारताची राज्यघटना राज्य धोरणांची निर्देशक तत्त्वांमध्ये कलम ४० नुसार राज्याला ग्रामपंचायती संघटीत करण्यासाठी पावले उचलण्याचे निर्देश देते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी करण्यात आलेले पूर्वीचे सर्व प्रयत्न आणि सुधारणांची परिणीती ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्ती कायदा सन १९९२ मध्ये झाली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाबरोबरच त्यांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठीच्या यंत्रणांचाही समांतर विकास झाला. अशा प्रकारे स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र ची सुरुवात महालेखाकार कार्यालय, यापासून सन १८८४ मध्ये मुंबईच्या बाह्य लेखापरीक्षण शाखेच्या स्वरूपात बदल होवून विविध ऐतिहासिक टप्प्यांतून एक पूर्ण वैधानिक संस्था म्हणून विकसित झाली आहे. सन १८९४ मध्ये सिंध आणि उत्तर विभागातील नगरपालिकांचे लेखापरीक्षण या शाखेकडे सोपवण्यात आले. सन १९०७ मध्ये इतर नगरपालिका, जिल्हा स्थानिक मंडळे आणि कॅन्टोन्मेंट फंड (कटक मंडळ) यांचा समावेश करण्यासाठी शाखेची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांचा विस्तार करण्यात आला. सन १९१३ मध्ये विभागाची आणखी पुनर्रचना करण्यात आली आणि तालुका स्थानिक मंडळे, नागरी रुग्णालये यांचे लेखापरीक्षण सोपविण्यात आले ज्यामुळे ही शाखा स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाची खरी अग्रदूत बनली.

मुंबई स्थानिक निधी अधिनियम, १९३० ने स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाची व्याप्ती परीक्षक संस्था म्हणून अधिक मजबूत केली. ज्यामुळे स्थानिक संस्था, नगरपालिका, शाळा मंडळे आणि अधिसूचित श्रेत्र समित्यांसाठी अधिसूचना क्र. ७६२९ दिनांक २३ मार्च १९३१ व अधिसूचना क्र. ९२७०, दिनांक ०२ नोव्हेंबर १९३२ द्वारे संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा वैधानिक लेखापरीक्षक बनले.

मुंबई शासन वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक टीआरए-१६५७-८०५-सी-जी-३, दिनांक ३० एप्रिल १९५८ नुसार १९५८ मध्ये एक महत्त्वाच्या वाटचालीमध्ये हा विभाग भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांच्या विभागाकडून दिनांक ०१ मे १९५८ पासून राज्य सरकारच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आला. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (विस्तार आणि सुधारणा) अधिनियम, १९६० पारीत होऊन स्थानिक निधी लेख्याची मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा म्हणून पुनर्रचना

केली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १ मे १९६२ पासून स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग नव्याने निर्माण झालेल्या संचालनालय, लेखा व कोषागारे अंतर्गत आणण्यात आला.

ग्रामपंचायत लेख्यांचे लेखापरीक्षण १९६४ पासून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातून स्थानिक निधी लेखापरीक्षा कक्षेत आणले गेल्याने विभागाची व्याप्ती वाढली आहे.

७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्ती कायद्याने पंचायती राज संस्था व नागरी स्वराज्य संस्थाबाबत विभागाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. परिणामी त्यांच्या आर्थिक स्त्रोतांमध्येही लक्षणीय वाढ झाली, त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी स्वतंत्र संचालनालय निर्माण करणे आवश्यक झाले. त्यानुसार महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवा प्र. २०.०८/ प्र.क्र. ७९/२/कोषा प्रशा-०३, दिनांक २८ मे २००८ अन्वये स्थानिक निधी लेखा संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. तसेच शासन निर्णय क्र. सेवा प्र. २०.०८/ प्र.क्र. १९७/२/कोषा प्रशा-०३, दिनांक ०१ /०८/ २००८ नुसार मुख्य लेखापरीक्षकांना संचालनालयाचे प्रमुख म्हणून घोषीत केले.

१३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ३१ मार्च २०११ रोजी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. स्थानिले-१०१०/प्र.क्र.२६(ब)विमाप्रशासन दिनांक ३१ मार्च २०११ अन्वये महानगरपालिकेचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाकडे सोपविण्यात आले.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०११/प्र.क्र.७१/ कोषा.प्रशा-०३ दिनांक १८ एप्रिल २०११ अन्वये संचालनालयाचे “स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय ” असे सुधारीत नामाभिधान करण्यात आले आणि मुख्य लेखा परीक्षक, सह मुख्य लेखापरीक्षक, उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), उप मुख्य लेखापरीक्षक (कनिष्ठ) या पदांची अनुक्रमे संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालक अशी पुनर्रचना करण्यात आली.

------***------

प्रकरण २

संस्थात्मक रचना

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय कार्य करते. त्याचे मुख्य कार्यालय कोकण भवन, नवी मुंबई येथे असून संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा हे विभाग प्रमुख आहेत. कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर अशी सहा महसूल विभागांमध्ये सहा प्रादेशिक कार्यालये आहेत, ज्यांचे कार्यालय प्रमुख ‘सहसंचालक’ आहेत. जिल्हा कार्यालयाचे प्रमुख सहायक संचालक असतात. शासन निर्णय वित्त विभाग सेवाप्र २०१२/प्र.क्र. ९९/ कोषा (प्रशा-३) दिनांक ०६/१०/२०१२ अन्वये १३व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार महानगरपालिकांचे लेखापरीक्षण करण्यासाठी २०१२ मध्ये सहसंचालक (महानगरपालिका लेखापरीक्षण) नियंत्रणासाठी स्वतंत्र शाखा तयार करण्यात आली. महानगरपालिका लेखापरीक्षणानुसार उप संचालकांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येकी ३ उप विभागांमध्ये कार्यक्षेत्र विभागले गेले आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र.२०२०/प्र.क्र.१४/कोषा(प्रशा-०३), दिनांक २२.१२.२०२१ नुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाची सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुसार एकूण मंजूर पदे १४१९ सुधारित करण्यात आलेली आहे. त्यापैकी लेखापरीक्षणासाठी ११०८ कर्मचारी उपलब्ध आहेत. तसेच प्रत्येक लेखापरीक्षकांस प्रतिवर्षी १८५ श्रमदिन उपलब्ध होतात.

संघटनात्मक रचना


संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई
सहसंचालक, विभागीय कार्यालय (६)
कोंकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
सहसंचालक,
महानगरपालिका लेखापरीक्षा
सहायक संचालक, जिल्हा कार्यालये (३४)
उप संचालक
(उप विभाग -१)
कोंकण -२
उप संचालक
(उप विभाग -२)
कोंकण -०१
कोकण-०२
पुणे
उप संचालक
(उप विभाग -३)
नाशिक
औरंगाबाद
अमरावती
नागपूर

प्रकरण ३

कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या

अ) **स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाची लेखापरीक्षणाविषयक कार्ये :**

१. राज्यातील सर्व पंचायती राज संस्थांचे लेखापरीक्षण ज्यामध्ये जिल्हा परिषदा (३४), पंचायत समित्या (३५१) आणि ग्रामपंचायती (२७,८२४) आहेत.

२. राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण ज्यामध्ये महानगरपालिका (२७), महानगरपालिका शिक्षण मंडळे (३), महानगरपालिका परिवहन उपक्रम (६), नगर परिषदा (२४३), नगर पंचायती (१३२) आहेत.

३. कृषी विद्यापीठे (४), महाराष्ट्र पशुवैद्यकीय आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ (१) आणि इतर संकिर्ण संस्थांचे लेखापरीक्षण (२२४).

४. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम, १९३१ मधील नियम क्र. १५ अंतर्गत आवश्यकतेनुसार विशेष लेखापरीक्षण करणे.

नियामक संरचना / चौकट :

१. मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम , १९३१, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम (सुधारणा) अध्यादेश, २०११, स्थानिक निधी लेखा कार्यालयीन नियमपुस्तिका, १९६४ व १३ व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.स्थानिले-१०१०/प्र.क्र.२६(ब)विमाप्रशासन दिनांक ३१/०३/२०११ नुसार जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण केले जाते.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत (लेखापरीक्षण) नियम, १९६१ नुसार ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण केले जाते.

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण महानगरपालिका अधिनियम, १९४९, व त्यामध्ये झालेली सुधारणा २०११, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व त्यामधील वेळोवेळी झालेल्या सुधारणांनुसार केले जाते. तसेच १३व्या वित्त आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.स्थानिले-१०१०/प्र.क्र.२६(ब)विमाप्रशासन दिनांक ३१.०३.२०११ नुसार लेखापरीक्षण केले जाते.

४. ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या PESA या निधीचे शासन निर्णय क्र. पेसा अ/२०१७ / प्र.क्र. १४४/ का-१७/ दिनांक ०४.१०.२०१७ नुसार लेखापरीक्षण केले जाते.

५. संकिर्ण संस्थांचे लेखापरीक्षण संबंधित संस्थांच्या कायद्यानुसार केले जाते.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे खालील संस्थांचे लेखापरीक्षण केले जाते :-

अ.क्र. (१)	वर्गवारी (२)	लेखापरीक्षा संस्थाचे प्रकार (३)	संस्थाची संख्या (४)
१	पंचायती राज संस्था	जिल्हा परिषद	३४
२		पंचायत समिती	३५१
३		ग्रामपंचायती	२७८२४
४	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था	नगर पंचायती	१३२
५		नगरपालिका	२४३
६		महानगरपालिका	२७
७		महानगरपालिका अंतर्गत शिक्षण मंडळे	३
८		महानगरपालिका परिवहन उपक्रम	६
९	संकिर्ण संस्था	कृषि विद्यापीठे	४
१०		महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ	१
११		इतर संकिर्ण संस्था	२२४
	एकूण		**२८८४९**

लेखापरीक्षण प्रक्रिया :-

मागील आर्थिक वर्षासाठी नियुक्त केलेल्या संस्थेचे लेखापरीक्षण पुढील आर्थिक वर्षात संपूर्ण वर्षभर बारकाईने नियोजन आणि वेळेच्या अंमलबजावणीसह केले जाते.

जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगरपरिषदांच्या तपशीलवार लेखापरीक्षणासाठी मार्च महिन्याचे व्यवहार अनिवार्य आणि कोणतेही दोन महिन्यांची यादृच्छिक निवड करून तपशिलवार लेखापरीक्षण केले जाते., उर्वरित कालावधीसाठी आर्थिक व्यवहारांचा सर्वसाधारण आढावा घेतला जातो.

ग्रामपंचायतींसाठी प्रत्येक महिन्याच्या व्यवहारांचे तपशिलवार लेखापरीक्षण केले जाते. महानगरपालिकांसाठी एका महिन्याच्या व्यवहारांचे तपशिलवार लेखापरीक्षण केले जाते आणि उर्वरित कालावधीतील आर्थिक व्यवहारांचा सर्वसाधारण आढावा घेतला जातो. राज्य आणि केंद्र सरकारकडून महापालिकांना मिळणाऱ्या अनुदानाशी संबंधित खर्चाचे तपशिलवार लेखापरीक्षणही दरवर्षी केले जाते.

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षाविभागाद्वारे केले जाणारे लेखापरीक्षण हे आर्थिक/अनुपालन लेखापरीक्षण असते. ज्यामध्ये अपहार, दुर्विनियोग किंवा अफरातफर यावर विशेष भर असतो.

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षाविभागाद्वारे निर्गमित केलेल्या लेखापरीक्षण अहवालात खालीलप्रमाणे लबाडी व अपहार प्रकरणे आढळलेली आहेत :-

अनु.क्र.	तपशील	२०२०-२०२१		२०२१-२०२२	
		प्रकरणे	रक्कम (रू)	प्रकरणे	रक्कम (रू)
१	सुरवातीची शिल्लक	३८१२३	४१९४८६९१४१	३९४४५	५१५६२६३२१२
२	नवीन प्रकरणे	३२७७	१०७४३११६२४	४१९	२३९१०७८१४
३	एकूण प्रकरणे	**४१४००**	**५२६९१८०७६५**	**३९८६४**	**५३९५३७१०२६**
४	निकाली निघालेली प्रकरणे	१९५५	११२९१७५५३	२१४	३०९८४०३७
५	प्रलंबित प्रकरणे	**३९४४५**	**५१५६२६३२१२**	**३९६५०**	**५३६४३८६९८९**

टीप: - २०२१-२०२२ वर्षाची माहिती सप्टेंबर २०२१ पर्यंतची आहे.

ब) लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल :

I) पंचायती राज संस्थांच्या लेखापरीक्षणाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल :

पंचायती राज संस्थावरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे पंचायती राज संस्थाच्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालांच्या आधारे संकलित केला जातो. गंभीर चुकांवर आणि अनियमिततेवर विशेष लक्ष केंद्रित करून पंचायती राज संस्थांच्या आर्थिक स्थितीचे सर्वसमावेशक विश्लेषण या अहवालात असते. हा अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे दर वर्षी ग्रामविकास विभागाला सादर केला जातो जो प्रतीवर्षी ग्रामविकास विभाग महाराष्ट्र विधिमंडळासमोर ठेवते. वर्ष २०१७-२०१८ साठी पंचायती राज संस्थाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवालास राज्य विधानमंडळाकडून मान्यता देण्यात आलेली आहे. तर वर्ष २०१८-२०१९ साठी पंचायती राज संस्थाचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल ग्रामविकास विभागाला सादर करण्यात आलेला आहे. तसेच सन २०१९-२०२० चा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

II) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल:

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार केले जातात, ज्यामध्ये गंभीर चुकांवर आणि अनियमिततेवर विशेष लक्ष केंद्रित करून त्यांच्या आर्थिक कामकाजाचे व्यापक विश्लेषण दिले जाते .हा अहवाल स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाद्वारे नगरविकास विभागाकडे सादर करून तो महाराष्ट्र विधीमंडळासमोर ठेवला जातो. सन २०१३-२०१४ या वर्षाचा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल विधीमंडळासमोर ठेवण्यात आला आहे. सन २०१४-१५ चा लेखापरीक्षण पुनर्विलोकन अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

------***-------

प्रकरण ४

आर्थिक वर्ष २०२२-२३ साठीच्या कामाचा आढावा

अ) आर्थिक वर्ष २०२२-२०२३ साठी कामाचे प्रमाण :
(प्रलंबित लेखापरीक्षणासह)

अ.क्र.	**संस्था**	**वित्तीय वर्ष २०२१-२२* ची लेखापरीक्षण स्थिती**	**वित्तीय वर्ष २०२२-२३ चे नियमीत लेखापरीक्षण**
१	जिल्हा परिषद (एकूण विभाग)	४०५	४०६
२	पंचायत समिती	२८३	३५१
३	नगरपालिका	२८८	२४३
४	नगरपंचायती	१५६	१३२
५	महानगरपालिका	१०६	२७
६	महानगरपालिका परिवहन उपक्रम	२३	६
७	महानगरपालिका शिक्षण मंडळे	३	०
८	कृषि विद्यापिठे	५	४
९	पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ	३	१
१०	संकिर्ण संस्था	५०५	२२४
एकूण		**१७७७**	**१३९४**

***टीप.**---२०२१-२२ वर्षाची माहिती सप्टेंबर २०२१ पर्यंतची आहे.

ब) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी ग्रामपंचायतींच्या कामाचे घटक:-

स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग वार्षिक उत्पन्न रु. २५,००० पेक्षा जास्त असलेल्या ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण करते, एक वर्षाचे लेखापरीक्षण एक घटक म्हणून मानले जाते. २०२०-२१ या वर्षासाठी २७८२४ ग्रामपंचायत घटकाचे नियमित लेखापरीक्षण सुरू आहे. आणि २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ २०१९-२० साठी अनुक्रमे ८६०, १९५५, ५०३४, १०१६८ आणि १४३४१ ग्रामपंचायत लेखापरीक्षण घटक प्रलंबित आहेत. सदर या वित्तीय वर्षाचे प्रलंबित घटकांचे लेखा परीक्षण घटक नियमित लेखापरीक्षणासोबतच हाती घेतले आहेत, ते जून २०२२ पर्यंत पूर्ण होईल.

वार्षिक उत्पन्नानुसार लेखापरीक्षण करावयाच्या ग्रामपंचायतींची संख्या दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे :

अ.क्र.	ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न	२०२२-२०२३ मध्ये लेखापरीक्षण करण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या
१	उत्पन्न रू .२५,०००/- ते रु ५,००,०००/-	९०३८
२	उत्पन्न रू ५,००,०००/- ते रू २५,००,०००/-	१३२९९
३	उत्पन्न रू २५,००,०००/- पेक्षा जास्त	५४८७
	एकूण	**२७८२४**

क) सशुल्क लेखापरीक्षण संस्था :

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०, त्यानंतरच्या सुधारणा आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियम, १९६१ मधील तरतुदी अंतर्गत समाविष्ट असलेल्या संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी कोणतेही लेखापरीक्षा शुल्क आकारले जात नाही. तथापि, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार संकिर्ण संस्थांचे सशुल्क लेखापरीक्षण देखील आवश्यक असेल तेव्हा केले जाते. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण -२०१९/प्र.क्र.३९/कोषा प्रशा ४, दिनांक ०२.०८.२०१९ नुसार संकिर्ण संस्थांचे लेखापरीक्षणाकरिता शुल्क निर्धारीत केले आहे.

तथापि स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाला पुढील संस्थांकडून आकारण्यात आलेले एकूण लेखापरीक्षण शुल्क अद्याप प्राप्त झालेले नाही.

संकिर्ण संस्थांकडे प्रलंबित असलेले लेखापरीक्षण शुल्क :

अ.क्र.	तपशील	२०२०-२०२१	२०२१-२०२२
१	एकूण संस्था	६७	६६
२	प्रारंभिक प्रलंबित लेखापरीक्षण शुल्क (रुपयामध्ये)	१९३२९०६९	१८९१३७२५
३	लेखापरीक्षण कालावधीत वसूलपात्र शुल्क (रुपयामध्ये)	४८१५४०२	१०६५२४६८
४	एकूण लेखापरीक्षण शुल्क (रुपयामध्ये)	**२४१४४४७१**	**२९५६६१९३**
५	वसूल कलेले शुल्क (रुपयामध्ये)	५२३०७४६	९७५००१
६	शिल्लक लेखापरीक्षण शुल्क (रुपयामध्ये)	**१८९१३७२५**	**२८५९११९२**

टीप: - २०२१-२०२२ वर्षाची माहिती सप्टेंबर २०२१ पर्यंतची आहे.

विशेष लेखापरीक्षण :-

अ) जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे विशेष लेखापरीक्षण :

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१७/ प्र.क्र.३६/ कोषा. प्रशा-४ दिनांक ३०/०५/२०१७ अन्वये नगरविकास विभाग/विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्या कडून आलेल्या प्रस्तावानंतर मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम, १९३१ च्या नियम क्रमांक १५ नुसार नियमित वार्षिक लेखापरीक्षणाव्यतिरिक्त, पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे विशेष लेखापरीक्षण केले जाते.

सन २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षाची विशेष लेखापरीक्षणाची स्थिती :-

अ.क्र..	तपशिल	२०२०-२०२१	२०२१-२०२२
१	विशेष लेखापरीक्षणाचे घटक	०९	०४
२	वापरलेले श्रमदिन	४२४	३१९

टीप : - वर्ष २०२१-२०२२ ची माहिती सप्टेंबर २०२१ पर्यंतची आहे.

ब) ग्रामपंचायतींचे विशेष लेखापरीक्षण :

महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखापरीक्षण नियम, १९६१ च्या नियम ८ नुसार व जिल्हाधिकारी किंवा पंचायत समिती किंवा जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या प्रस्तावानुसार वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१७/ प्र.क्र.३६/ कोषा. प्रशा-४/ दिनांक ३०/०५/२०१७ अन्वये ग्रामपंचायत लेख्यांचे विशेष लेखापरीक्षण केले जाते.

सन २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायतींच्या विशेष लेखापरीक्षणाची स्थिती :-

अ.क्र.	तपशिल	२०२०-२०२१	२०२१-२०२२
१	विशेष लेखापरीक्षणाचे घटक	०	१५३
२	वापरलेले श्रमदिन	०	१०५

टीप : - वर्ष २०२१-२०२२ ची माहिती सप्टेंबर २०२१ पर्यंतची आहे.

------***------

(शा.म.मु.) एच २४४९---४ (२००---३-२०२२)

प्रकरण - ५

ई-गव्हर्नन्सच्या दिशेने

महाराष्ट्र सरकारने २०११ मध्ये सरकारी यंत्रणेमध्ये अधिक कार्यक्षमता जबाबदारी आणि पारदर्शकता आणण्यासाठी ई-गव्हर्नन्स धोरण स्विकारले. त्यानुसार स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत.

(i) महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा : (MahaLFA)

www.mahalfa.maharashtra.gov.in :

हे स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागासाठीचे वेब पोर्टल आहे, या वेब पोर्टलवर विभागाविषयी इतिहास, लेखापरीक्षकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, लेखापरीक्षणाची नियमित संरचना, कायदे व नियमावली या सारखी माहिती, नागरीकाची सनद, ज्येष्ठता सूची, रिक्त पदे, बदली आणि पदोन्नतीचे आदेश, माहिती अधिकार अंतर्गत माहिती इ. माहिती नमुद केली आहे.

(ii) महाराष्ट्र लेखापरीक्षण माहिती प्रणाली : (MAINS)

www.mains.maharashtra.gov.in

लेखापरीक्षण प्रक्रिया स्वयंचलित करण्यासाठी आणि लेखापरीक्षण परिच्छेदाचा संमंक (डेटाबेस) तयार करण्यासाठी ही प्रणाली राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (**NIC**), पुणे च्या मदतीने विकसित केली आहे. सदर प्रणाली लेखापरीक्षण नियोजनापासून ते लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यापर्यंत लेखापरीक्षणाची संपूर्ण प्रक्रिया स्वयंचलित पध्दतीने करते. तसेच ही प्रणाली लेखापरीक्षणाचे अनुपालन, देखरेख आणि पुनर्विलोकन अहवाल तयार करणेदेखील सुलभ करते. प्रणाली ची मुख्य वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

• यात लेखापरीक्षणाची पूर्व तयारी, लेखापरीक्षण कालावधीत परिच्छेद तयार करणे, लेखापरीक्षणानंतरचे अनुपालन इ. बाबी वर देखरेख करणे समाविष्ट आहे.

• लेखापरीक्षणाचे वेळापत्रक तयार करणे, लेखापरीक्षण परिच्छेद प्रक्रिया, संकलन आणि लेखापरीक्षण अहवाल तयार करण्यासंबंधी ऑनलाइन कार्ये करते. तसेच ऑनलाइन पुनर्विलोकन लेखापरीक्षण अहवाल व त्याचे अनुपालन प्रक्रिया तयार करण्याबाबत नजीकच्या भविष्यात नियोजित केली आहे.

• यामध्ये ऑफलाइन टेम्पलेट्सद्वारे प्रारूपलेखापरीक्षण परिच्छेद तयार करण्याची आणि नंतर प्रणालीवर ऑनलाइन अपलोड करण्याची सुविधा आहे.

• डेटा अपलोड करण्यापूर्वी (लेखापरीक्षण परिच्छेद) ऑफलाइन मोडमध्ये **Document Verification Utility (DVU)** टेम्प्लेटद्वारे प्रक्रिया केली जाते आणि प्रमाणित केली जाते.

• प्रणाली महाराष्ट्र राज्य डेटा केंद्र, चौथा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई येथून संचालित केली जाते.

• स्थानिक स्वराज्य संस्थांकडून परिच्छेदाचे अनुपालन स्वीकारण्यासाठी L-CAP पोर्टल सक्रिय करण्यात आले आहे.

• पंचायती राज स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण पुर्नविलोकन अहवाल तयार करण्यासाठी RAR पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

• संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांनी MAINS प्रणाली विकसित केलेली आहे. पंचायती राज संस्थांच्या लेखा परीक्षणाचा आढावा अहवाल तयार करण्यासाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे परिच्छेदाचे अनुपालन करण्यास मान्यता देण्यासाठी L-CAP पोर्टल व RAR पोर्टलमध्ये SMS सुविधा लागू करण्यात आली आहे.

ई-स्वाक्षरी (E-sign) :

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी विकसित केलेल्या MAINS प्रणालीद्वारे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना आगाऊ लेखापरीक्षण सूचना पत्र, कार्यालयीन आदेश, वार्षिक लेखापरीक्षण अहवाल, अर्धसमास पत्रे इ. ई-स्वाक्षरीद्वारा तयार केले जातात. आणि दिनांक १४.१०.२०२१ पासून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (SMS) संप्रेषित केले जातात.

परिच्छेद अनुपालन पोर्टल :

L-CAP (LOCAL FUND COMPLIANCE OF AUDIT PARA)

राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे मार्फत MAINS प्रणालीवर सदर पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पोर्टलवर, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी सन २०१३-२०१४ पासूनचे प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन तयार करून प्रलंबित परिच्छेद ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाने MAINS प्रणालीवरील विहित कार्यपध्दतीनुसार, सह-संचालक आणि सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांनी ऑनलाइन प्राप्त झालेल्या अनुपालनावर कारवाई करणे आवश्यक आहे.

L-CAP पोर्टल १२ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर कार्यान्वित करण्यात आले. ०१ नोव्हेंबर २०१९ पासून, L-CAP पोर्टल सर्व जिल्ह्यामध्ये स्विकारण्यात आले आहे. सर्व जिल्ह्यांतील जिल्हा परिषद, पंचायत समिती कार्यालयांनी २०१३-२०१४ च्या

लेखापरीक्षण वर्षातील प्रलंबित परिच्छेद L-CAP PORTAL द्वारे स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयास सादर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र (NIC), पुणे यांच्या समन्वयाने जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्यानुसार प्रलंबित परिच्छेदांचे अनुपालन स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाकडून L-CAP PORTAL मार्फत करण्यात येत आहे.

Audit Online System (AOL): (ऑनलाईन लेखापरीक्षण प्रणाली)

पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १५ एप्रिल २०२० रोजी सर्व राज्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचे आयोजन केले आणि १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींवर विशेष भर देवून ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण ऑडिट ऑनलाइन प्रणालीद्वारे करणेबाबत चर्चा केली. त्यानुसार महाराष्ट्र राज्याने वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये AOL प्रणालीचा स्वीकार केला आहे.

पंचायती राज मंत्रालयाने (MoPR) सुरू केलेल्या ई-पंचायत मिशन मोड (e-panchayat Mission Mode)च्या प्रकल्पांतर्गत पंचायत एंटरप्राइझ सूटचा (Panchayat Enterprise Suite) (PES) एक भाग म्हणून विकसित केलेल्या सामान्य आणि मुक्त स्रोत प्रणाली पैकी एक ऑडिट ऑनलाइन (AOL) प्रणाली आहे. ऑडिट ऑनलाईन (AOL) प्रणाली पंचायतींच्या तिन्ही स्तरांवर जसे की जिल्हा परिषद, गट विभाग (पंचायत समिती) आणि ग्रामपंचायत यांच्या खात्यांचे आर्थिक लेखापरीक्षण सुलभ करते. लेखापरीक्षणाचे समकक्ष विभाग (राज्य महालेखापरीक्षक व स्थानिक निधी लेखापरीक्षा विभाग) आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (ULBs) ऑडिट ऑनलाईन (AOL) प्रणालीच्या प्रक्रियेनुसार अंतर्गत लेखापरीक्षण आणि बाह्य लेखापरीक्षण अशा दोन्ही लेखापरीक्षणासाठी तपशील अभिलेखबध्द करण्याची सुविधा देते. ही आज्ञाप्रणाली (सॉफ्टवेअर) केवळ लेख्यांचे ऑनलाइन आणि ऑफलाइन लेखापरीक्षणच करीत नाही तर लेखापरीक्षणात सामील असलेल्या लेखापरीक्षकांच्या आणि लेखापरीक्षण पथकाच्या संबंधित यादीसह लेखापरीक्षकाच्या मागील लेखापरीक्षण नोंदी ठेवण्याच्या उद्देशाने देखील काम करते. ही प्रणाली एक चांगले वित्तीय लेखापरीक्षणाचे साधन म्हणून काम करते तसेच लेखापरीक्षणाची पारदर्शकता आणि जबाबदारी सुधारते. तसेच माहिती सार्वजनिक अनुक्षेत्र (डोमेन) मध्ये आणि इतर PES अनुप्रयोगांद्वारे वापरण्यासाठी उपलब्ध आहे.

२०२०-२१ या वित्तीय वर्षाचा १४ व्या आणि १५ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना प्राप्त झालेल्या निधीचे १०० टक्के लेखापरीक्षण मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे आणि त्यानुसार लेखापरीक्षण अहवाल ऑडिट ऑनलाइन (AOL) प्रणालीवर प्रकाशित करायचा आहे. त्यानूसार १३/१२/२०२१ पासून ग्रामपंचायतींचे online लेखापरीक्षण हाती घेण्यात आले आहे.

-------***-------

प्रकरण ६

परिशिष्ट १
अर्थसंकल्पिय तरतूद

(रुपये हजारांत)

तपशील	प्रत्यक्ष खर्च २०२०-२०२१			अर्थसंकल्प २०२१-२०२२			सुधारलेले अंदाज २०२१-२०२२			अर्थसंकल्प २०२२-२०२३		
	अनिवार्य	कार्यक्रम	एकूण	अनिवार्य	कार्यक्रम	एकूण	अनिवार्य	कार्यक्रम	एकूण	अनिवार्य	कार्यक्रम	एकूण
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३
उद्दिष्टनिहाय वर्गीकरण - वित्त विभाग - मागणी क्रमांक जी - ५ २०५४ , कोषागार व लेखा प्रशासन (००) ०९८ - स्थानिक निधी लेखापरीक्षा (००) (०१) मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (२०५४०१११) * (अनिवार्य)												
०१ वेतन	८६४५६१	०	८६४५६१	९९११६७	०	९९११६७	९९११६७	०	९९११६७	१०८४१२४	०	१०८४१२४
०२ मजूरी	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
०३ अतिकालिक भत्ता	९५	०	९५	४३२	०	४३२	१५१	०	१५१	३९२	०	३९२
०६ दूरध्वनी, वीज व पाणी शुल्कक	२११२	०	२११२	३३१८	०	३३१८	३३१८	०	३३१८	३३१८	०	३३१८
१० कंत्राटी सेवा	३४१	०	३४१	११११९	०	११११९	११११९	०	११११९	११११९	०	११११९
११ देशांतर्गत प्रवास खर्च	७७७३	०	७७७३	२१५१४	०	२१५१४	१६१३६	०	१६१३६	२२१२३	०	२२१२३
१३ कार्यालयीन खर्च	१७६५३	०	१७६५३	२७९५८	०	२७९५८	१६६०९	०	१६६०९	२५८५८	०	२५८५८
१४ भाडे, पट्टी व कर	५७४४	०	५७४४	९०००	०	९०००	८१००	०	८१००	७४५२	०	७४५२
१६ प्रकाशने	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
१७ संगणक खर्च	४८८१	०	४८८१	१७९८५	०	१७९८५	१११४२	०	१११४२	१८८८४	०	१८८८४
२४ पेट्रोल, तेल व वंगण	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
२८ व्यावसायिक सेवा	३०	०	३०	५०	०	५०	४३	०	४३	५०	०	५०
एकूण - ०९८, स्थानिक निधी लेखापरीक्षा	९०३२२२	०	९०३२२२	१०८२५५३	०	१०८२५५३	१०५७७९५	०	१०५७७९५	११७३३३०	०	११७३३३०

परिशिष्ट - २
पदनिहाय विवरणपत्र

अ.क्र.	पदनाम	संवर्ग	वेतनमान	मंजूर पदे	भरलेली पदे (सप्टेंबर २०२१ अखेर)
१	संचालक	संचालक	S-२९ १३११००-२१६६००	१	१
२	सह संचालक	सह संचालक	S-२५ ७८८००-२०९२००	८	५
३	उप संचालक	गट अ (वरिष्ठ)	S-२३ ६७७००-२०८७००	४	२
४	सहाय्यक संचालक	गट अ (कनिष्ठ)	S-२० ५६१००-१७७५००	५७	५०
५	लेखापरीक्षा अधिकारी	गट ब (राजपत्रित)	S-१६ ४४९००-१४२४००	६७	४८
६	सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी	गट ब (राजपत्रित)	S-१५ ४१८०० — १३२३००	१६१	१३३
७	वरिष्ठ लेखापरीक्षक	गट क	S-१३ ३५४००-११२४००	२०३	१९२
८	कनिष्ठ लेखापरीक्षक	गट क	S-१० २९२००-९२३००	६२०	४९५
९	लघुलेखक (वरिष्ठ श्रेणी)	गट क	S-१५ ४१८००-१३२३००	१	१
१०	लघुलेखक (निम्न श्रेणी)	गट क	S-१४ ३८६०० — १२२८००	७	३
११	लेखापरीक्षा लिपिक	गट क	S-६ १९९००-६३२००	१५३	१२७
				१२८२	**१०५७**
१२	वाहन चालक	गट क	S-६ १९९०० — ६३२००	४२	४
१३	नाईक / दप्तरी / रोनिओ	गट ड	S-३ १६६००-५२४००	२०	१३
१४	शिपाई	गट ड	S-१ १५०००-४७६००	७५	३८
१५	पहारेकरी	गट ड	S-१ १५००० — ४७६००	०	०
				१३७	५५
			एकूण ..	**१४१९**	**१११२**

वित्त विभाग शासन निर्णय क्र. सेवाप्र-२०२०/प्र.क्र.१४/कोषा प्रशा-३, दिनांक २२.१२.२०२१ अन्वये स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधात १२८२ नियमित पदांना मंजुरी देण्यात आली असून वाहन चालक, नाईक/दफ्तरी/रोनिओ, शिपाई हे संवर्ग मृत संवर्ग म्हणून घोषित केले आहेत. सदर पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करावयाची असून पद रिक्त झाल्यानंतर बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाचे आहे.

परिशिष्ट ३

कार्यरत महिला अधिकारी/ कर्मचारी यांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारे विवरणपत्र

अ.क्र.	संवर्ग	वर्ष	एकूण कर्मचारी	पुरूष कर्मचारी संख्या	महिला कर्मचारी संख्या	अल्पवयीन मुलींशी विवाह क्केलेल्या प्रकरणांची संख्या	हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार उद्‌भवलेल्या प्रकरणांची संख्या	महिलांच्या लैंगिक छळाबाबतची प्रकरणे कार्यवाही / संख्या	उपाययोजना / केलेली कार्यवाही / शेरा
१	गट अ	२०२०-२०२१	५९	४१	१८	०	०	०	-
		२०२१-२०२२	५९	४५	१४	०	०	०	-
२	गट ब (राजपत्रित)	२०२०-२०२१	१८३	१६५	१८	०	०	०	-
		२०२१-२०२२	१७५	१५३	२२	०	०	०	-
३	गट क	२०२०-२०२१	८६९	६५२	२१७	०	०	१	श्री. कि.अ. इंगोले यांचे विरुध्द महिला कर्मचारी यांचे लैंगिक शोषण छळाबाबतचे प्रकरणी विभागीय चौकशी पूर्ण झालेली असून अंतिम निर्णय होणे बाकी आहे.
		२०२१-२०२२	८२७	६१७	२१०	०	०	०	-
४	गट ड	२०२०-२०२१	५४	४७	७	०	०	०	-
		२०२१-२०२२	५१	४४	७	०	०	०	-
एकूण		२०२०-२०२१	**११६५**	**९०५**	**२६०**	०	०	१	-
		२०२१-२०२२	**१११२**	**८५९**	**२५३**	०	०	०	-

टीप - सन २०२१-२२ ची माहिती माहे सप्टेंबर २०२१ अखेरची आहे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई